नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/०८/२०२६ ( मंगळवार )**

## डायल ११२ आपात्कालीन तक्रार सुविधा क्रमांकावर खुनाची खोटी माहिती देऊन पोलिसांची दिशाभूल करणाऱ्या इसमाविरुद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन बुट्टीबोरी:–** शासकीय आपत्कालीन तक्रार सुविधा डायल ११२ (Dial 112) वर एका मुलीची हत्या झाल्याची खोटी माहिती देऊन पोलीस प्रशासनाची दिशाभूल करणाऱ्या विक्की अशोक सांभारे वय १९ वर्ष, रा. सातनवरी, ता. जि. नागपूर या युवकाविरुद्ध बुट्टीबोरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रकरणाची हकीकत याप्रमाणे आहे की, आज दिनांक ११ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेच्या सुमारास डायल ११२ च्या कंट्रोल रूमला एका कॉलद्वारे माहिती मिळाली की, बुट्टीबोरी येथील उड्डाणपुलाजवळील हनुमान मंदिरासमोर एका २० वर्षीय मुलीच्या पोटात चाकू भोसकून तिची हत्या करण्यात आली आहे आणि आरोपीला पकडून ठेवले आहे.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. वरीष्ठांच्या मार्गदर्शनात बुट्टीबोरी पोलीसांनी तात्काळ दखल घेत बुट्टीबोरी पोलीस ठाण्यातील पथक तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तातडीने घटनास्थळी रवाना झाले. मात्र नमूद ठिकाणी कोणतीही अनुचित घटना घडल्याचे दिसून आले नाही. कॉलरशी संपर्क साधला असता, तो उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला आणि नंतर त्याने मोबाईल बंद केला. परिसरात शोध घेतला असता अशी कोणतीही घटना घडली नसल्याची माहिती मिळाली नाही. त्यानंतर नागपूर ग्रामीण सायबर सेलच्या मदतीने कॉलरचे लोकेशन मिळवून पोलिसांनी त्याला धामणा (ता. जि. नागपूर) येथील एका शेतातून ताब्यात घेतले. विचारपूस केली असता, त्याने पोलिसांना डायल ११२ वर खुनाची खोटी माहिती दिल्याची कबुली दिली.

सदर प्रकरणात बुट्टीबोरी पोलीसांनी आरोपी विक्की अशोक सांभार, वय १९ वर्ष, रा. सातनवरी याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता च्या कलम २१७ अन्वये शासकीय यंत्रणेची दिशाभूल करून नाहक त्रास होण्याच्या उद्देशाने खोटी माहिती दिल्याने सदर प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

**नागपूर ग्रामीण पोलीसांतर्फे सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, डायल ११२ ही सुविधा आपत्कालीन तक्रार सेवेसाठी आहे, याचा गैरवापर करून खोट्या बातम्या देणारे किंवा अफवा पसरविणाऱ्या व्यक्तीवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल. याची नागरीकांनी खबरदारी घ्यावी.**

## गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद (३० गोवंश जनावरांची सुटका, कन्हान पोलीसांची कामगिरी)

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक ११/०८/२०२६ रोजी कन्हान पोलीसांनी अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असता पेट्रोलींग दरम्यान गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी बोरडा टोल नाका हैदराबाद कडे जाणाऱ्या दिशेने नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान आयसर वाहन क्र. सी जी—१०/बी वाय—७८०४ हे भरधाव वेगाने व संशयास्पदरित्या पळून जात असताना मिळुन आल्याने पोलीसांनी वाहनाला थांबविण्याचा प्रयत्न केला असता हैदराबादकडे जाणाऱ्या सर्विस रोडने पळून जात असताना वाहन दोन रोडच्या मधील नालीमध्ये घुसल्याने वाहनातील चालक शेताच्या दिशेने अंधाराचा फायदा घेवुन पळून गेला व दुसऱ्या इसमास ताब्यात घेऊन त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने आपले नाव **सूर्यप्रकाश प्रदीप रात्रे, वय ३० वर्ष, रा. मौजा लवदा, जिल्हा मुंगेली छत्तीसगड** असे सांगितले. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ३० गोवंश जनावरे असे मिळुन आले. त्याला जनावराबाबत विचारपूस केली असता ते जनावरे अमरावती येथे कत्तलीकरिता घेऊन जात असल्याचे सांगितले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून आयसर वाहन क्र. सी जी—१०/बी वाय—७८०४ किंमती २०,००,०००/— रूपये आणि ३० गोवंश जनावरे किंमती ३,००,०००/—रूपये असा एकुण किंमती २३,००,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला. सदर ३० गोवंशांना उपचाराची व निवाराची आवश्यकता असल्याने तात्काळ गोशाळा देवलापार या ठिकाणी दाखल करण्यात आले.

नमुद प्रकरणी आयसर वाहन क्र. सी जी—१०/बी वाय—७८०४ चा फरार चालक आणि आरोपी सूर्यप्रकाश प्रदीप रात्रे, वय ३० वर्ष, रा. लवदा, जिल्हा मुंगेली छत्तीसगड यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम ११ (१), (अ), (ड), (फ) प्राण्यांना निर्दयतेने व क्रूरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम १९६०, सहकलम ५(अ) (१), (२), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६, ३(५) भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

# शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक ३१/०१/२०१९ रोजी पोलीस स्टेशन पारशिवनी हद्दीतील डब्ल्यु सी एल खदान सिंगोरी येथे प्रबंधक म्हणून नोकरीस असलेले फिर्यादी नामे राजेंद्र बळवंतराव ठाकरे, वय ५० वर्षे हे त्यांचे कर्तव्यावर हजर असता यातील **आरोपी नामे महेंद्र कचरू मेश्राम, वय ३९ वर्ष, रा. डोरली** हा त्याचे साथीदारांसह सिंगोरी डब्ल्यूसीएल खदान येथे जाऊन फिर्यादी यांना ''तू आम्हाला कोळसा का चोरू देत नाही? आणि पोलिसांना मध्ये आणतो त्यामुळे आता तुला आम्ही जिवंत सोडणार नाही,'' अशी धमकी देवुन फिर्यादीस शिवीगाळ केली व आरोपींनी सोबत आणलेले फायटर, चाकू व लाठ्यांनी फिर्यादी व कार्यालयात हजर असलेले इतर कर्मचारी यांना मारहाण करून जखमी केले तसेच कार्यालयातील सामान व शासकीय वाहनाचे काचा फोडून अंदाजे एक लाख रुपयाचे नुकसान करून आरोपीतांनी गैरकायद्याची मंडळी जमवून शासकीय कामात अडथळा निर्माण केला, अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन पारशिवनी येथे अपराध क्रमांक ४४/२०१९ कलम ३५३, ३३, १८६, २९४, १४७, १४८, १४९, भादंवि सहकलम ३, ४ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये आरोपीतांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला.

**तपासी अधिकारी श्री. विलास चव्हाण पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन पारशिवनी यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक ११/०८/२०२६ रोजी मा. अतिरीक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. पी. जे. मोडक यांनी नमुद आरोपी नामे महेंद्र कचरू मेश्राम, वय ३९ वर्ष, रा. डोरली यास कलम ३५३, ३३२ भादवि मध्ये ०१ महिना साधा कारावास व २०००/— रूपये दंड , दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. **श्रीमती सोनाली राऊत** यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग, सहा. पोलीस निरीक्षक श्री. किशोर शेरकी प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन पारशिवनी, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सपोनि श्री विशांत नांदगाये, पोहवा श्री रामदास कोराम, ब.नं २२४, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी पोहवा सुरेश धुर्वे, ब. नं. ८७८, पो.अं. दिनेश पटले, ब. नं. १२३५ पोलीस स्टेशन पारशिवनी यांनी मदत केली आहे.

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०४ गुन्हे नोंद. एकुण १,५४,०८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक १०/०८/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्ते तसेच सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण १,५४,०८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे १) अर्जुन सिताराम बांगडे, वय ५२ वर्ष, रा. केळवद २) अमोल दादाराव सुरुजसे, वय ३२ वर्ष, रा. वार्ड क्र. ३, केळवद ३) श्रावण नारायण सोनेकर, वय ४२ वर्ष, रा. उटीखाटा सौसर, म.प्र. ह. मु. दामोधर वाघमारे यांचे घरी केळवद हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे १) मनोज शामराव ठाकरे, वय ३७ वर्षे, रा. महालगांव, ता. भिवापुर, जि. नागपुर २) केतन रामचंद्र जोगे, वय ३० वर्षे, रा. बेला, ता. उमरेड, जि. नागपुर हे अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे १) रणधिर मंगल सोनकुसरे, वय ४५ वर्ष, रा. नंदापूरी, ता. मौदा २) राकेश पूरूषोत्तम गाढे, वय ४० वर्ष, रा. बेलडोंगरी, ता. पारशिवणी हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. नमुद आरोपीतांविरूद्ध कलम १२ व १२ (अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम अन्वये एकुण ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०४ गुन्हे नोंद

दिनांक १०/०८/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, ईतर साहित्य असा एकुण ३६,३५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) सलमान संजय सोलंकी, वय ३२ वर्ष, रा. डोंगरगाव, ता. काटोल, जि. नागपूर २) महिला आरोपी प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे** आरोपी नामे आकाश राजकुमार तेलंग, वय ३३ वर्ष, रा. बोरडा, ता. वरोरा, जि. चंद्रपुर, ह. मु. भारकस, ता. हिंगणा, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे विनोद दामु धुर्वे, वय ३२ वर्ष, रा. काचुरवाही, वार्ड क्र. ०३, ता. रामटेक याचेवर १ गुन्हा नोंद.

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७३६ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ११/०८/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७३६ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :– नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :– उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४५ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २९ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १३ आरोपी अशा एकुण १३९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :–** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ५२ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १६ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १६ आरोपी अशा एकुण १५० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :– कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २० आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १८ आरोपी अशा एकुण ७० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :–** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २५ आरोपी अशा एकुण ११७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :–** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५८ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४७ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३४ आरोपी अशा एकुण १६६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.









मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने